# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/01/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## नागपूर ग्रामीण पोलीस दलातील सेवानिवृत्त
## पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप

दिनांक ३१/०१/२०२३ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **''निरोप समारंभाच्या''** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) श्रेणी पोलिस उपनिरीक्षक श्री. देवशंकर सरजूप्रसाद गुप्ता, पोस्टे सावनेर २) सहायक फौजदार श्री. क्रिष्णा गणपतराव वाघ पोस्टे जलालखेडा ३) सहायक फौजदार श्री. उत्तम लक्ष्मणराव दुपारे, पोस्टे जलालखेडा ४) सहायक फौजदार श्री. अन्ना नामदेव जिचकार, पोस्टे कळमेश्वर ५) सहायक फौजदार श्री. संतोष बिरबलदास महंत, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण यांना पोलीस उप अधिक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे, नागपूर विभाग नागपूर यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस उप अधीक्षक (गृह) यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अशा शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस उप अधिक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली. या कार्यक्रमाला कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी (स्टाफ) उपस्थित होते.



# विनयभंग

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— दिनांक ३०/०१/२०२३ चे ०८.०० वा. ते ०९.०० वा. दरम्यान फिर्यादीच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने तिचे संडास बाथरूम तोडताड झाले असुन तिचा परीवार हा उघडयावर संडासला जातो. घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीची मुलगी वय १३ वर्ष ही गावातच संडासला गेली होती. तिच्या मागे मागे एक माणुस गेला आहे असे तिला तिचे घरा शेजारी राहणारी निकीता निगने हिने सांगीतले वरून फिर्यादीने जावून पाहीले असता तिला आरोपी नामे— उमाकांत रामाजी वानखेडे, वय ६५ वर्ष, रा. टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपूर हा तिला दिसला तेव्हा तिने त्याला आवाज दिला असता तो तेथुन पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ ड भा.द.वि. सहकलम ८, १२ पोस्को कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय मो. नं. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापूर** :— दिनांक २९/०१/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी पिडीता/मुलगी वय १० वर्ष हिला आरोपी नामे— योगेश रामकृष्ण बावनकर, वय २४ वर्ष, रा. नवेगाव देशमुख ता. भिवापुर जि. नागपुर याने पिडीतेला आपले मोटार सायकलवर बसवुन कारगाव तलावाकडे घेवुन गेला होता आरोपी याने पिडीतेला आपले मोबाईलमध्ये घाणेरडे फोटो दाखवुन पिडीतेचा विनयभंग केला व कुणालाही याबाबत सांगीतले तर जिवाने मारण्याची धमकी दिली आरोपीने पिडीता लहान व नासमज असल्याने तिचा फायदा घेवुन पिडीतेचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३६३, ५०६ भादवी सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक एस. एस भस्मे पोस्टे भिवापुर. मो नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**